**मेघ सावळा**

मेघ सावळा
दूर निघाला
नभी सोहळा
सजे निराळा

जिथे थांबला
तिथे मोकळा
सवे चालला
निळा शेमला

उडे पाचोळा
स्वैर धुराळा
तरी कोवळा
फुले डहाळा

हर्ष हिंदोळा
कृष्ण गोकुळा
स्पर्श जिव्हाळा
काळ्या कातळा

भिजे चित्कळा
प्रीती कमळा
मेघ सावळा
ऋतू आगळा

**-- संध्या रानडे**